# राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, इ. १० वी साठी

## माहितीपत्रक

**१ ) योजनेचे उद्दिष्ट : -** इयत्ता १० वीच्या प्रज्ञावान विद्यार्थ्याचा शोध घेऊन बुध्दिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्ट्रीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, या सहाय्यातून त्यांची बुध्दिमता विकसित व्हावी आणि त्या विकसित बुध्दिमत्तेने त्या विद्यार्थ्यांनी आपली विद्याशाखा व राष्ट्र यांची सेवा करावी, ही योजनेची उद्दिष्टे आहेत.

**२ ) विकेंद्रीकरण पध्दती :-** राष्ट्रीय शैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन. सी. इ. आर. टी.) यांनी २०१२-१३ पासून राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षा इयत्ता १० वी साठी दोन स्तरांवर घेण्याचे ठरविले आहे.

**३ ) राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा :-** महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, यांच्यामार्फत जिल्हातील विविध केंद्रावर सर्वसाधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या रविवारी घेण्यात येते.

**अ ) राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा : -** महाराष्ट्र राज्यासाठी ही परीक्षा, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे, यांच्यामार्फत जिल्हातील विविध केंद्रावर सर्वसाधारण नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या/तिसऱ्या रविवारी घेण्यात येते.

**ब ) राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा :-** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (एन. सी. इ. आर. टी.) यांच्यामार्फत सदर परीक्षा मे महिन्यात घेण्यात येईल. राष्ट्रीयस्तर परीक्षा महाराष्ट्रातील पुणे व मुंबई केंद्रावर होईल. राज्यस्तरीय परीक्षा यातून राष्ट्रीयस्तरासाठी निवड झालेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येते.

**३ ) पात्रता : -** महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही शासनमान्य शाळेतील इयत्ता १० वी मध्ये शिकत असलेल्या नियमित विद्यार्थी विद्यार्थीनीस राज्यस्तर परीक्षेस बसता येते. त्यासाठी वयाची, उत्पन्नाची अगर किमान गुणांची अट नाही. तसेच कोणतीही पूर्वी परीक्षा देण्याची अट नाही.

**४ ) अर्ज करण्याची पध्दत :-** दिनांक ७ ऑगस्ट २०१३ पासून ऑनलाइन आवेदनपत्रे परिषदेच्या वेबसाईटवर ( http://www.mscepune.in ) या संकेतस्थळावर ऑनलाइन भरावीत. ऑनलाईन भरलेल्या आवेदनपत्राच्या प्रिंट आऊटस विद्यार्थी, पालक व मुख्याध्यापक यांच्या स्वाक्षरीसह, जात व अपंगत्व प्रमाणपत्र यांच्या सत्य प्रत, S प्रत व SBI रक्कम भरलेल्या चलनासह जिल्हाचे शिक्षणाधिकारी यांचेकडे दिलेल्या विहित मुदतीपूर्वी सादर करावीत.

**५ ) निवडपध्दती : -** दोन स्तर अ ) राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा ब ) राष्ट्रीयस्तर प्रज्ञा शोध परीक्षा

| अ.क्र | विषयाचे नाव | एकुण गुण | एकुण ा प्रश्न | कालावधी | वेळ | पात्रता गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी (General Mental Ability Test ) | ५० | ५० | ४५ मिनिटे ( दृष्ट्री अपंगासाठी १५ मिनिटे जादा वेळ ) | १०.३० ते ११.१५ | ४० टक्के |
| २ | शालेय विषय भाषा चाचणी ( मराठी/इंग्रजी ) ( Scholastic Aptitude Test Language Testing ) Marathi/English | ४० | ४० | ४५ मिनिटे ( दृष्ट्री अपंगासाठी १५ मिनिटे जादा वेळ ) | ११.४५ ते १२.३० | ४०टक्के |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | शालेय क्षमता चाचणी ( भाषेतर शालेय विषय ) Scholastic Aptitude Test (English Subject other than Languages) | ९० | ९० | ९० मिनिटे ( दृष्टी अपंगासाठी ३० मिनिटे जादा वेळ ) | १३.१५ ते १४.४ ५ | ४०टक्के |

( एस, एस.टी व अपंग यांचे साठी पात्रता गुण ३२ टक्के आहेत. )

**अ ) सामान्य बौध्दिक क्षमता चाचणी : -** ही मानसशास्त्रीय चाचणी असून, त्यामध्ये कार्यकारण भावविश्लेषण, संकलन इत्यादी संकल्पनांवर आधारित ५० बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न असतील.

**ब ) भाषा चाचणी ( मराठी/ इंग्रजी ) : -** भाषा विषयक ४० वस्तुनिष्ठ प्रश्न

**क ) शालेय क्षमता चाचणी : -** ही सामान्यताः १० वीच्या अभ्यासक्रमांवर आधारित असेल, त्यामध्ये १) सामान्य विज्ञान २) समाज शास्त्र ( इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र ) ३) गणित व भूमिती असे तीन विषय असतील. या तीन विषयांचे एकूण ९० प्रश्न सोडवायचे असतात.

**ड ) उपविषयवार गुणांची विभागणी खालीलप्रमाणे असेल.**

**१ ) सामाजिक शास्त्र : -** इतिहास १० गुण, भुगोल १० गुण, राज्यशास्त्र १० गुण, अर्थशास्त्र ०५ गुण.

**२ ) मुलभूत विज्ञान : -** भौतिकशास्त्र १२ गुण, रसायनशास्त्र ११ गुण, जीवशास्त्र १२ गुण.

**६ ) माध्यम : -** प्रश्नपत्रिका मराठी, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, उर्दु, सिंधी, कन्नड व तेलुगू या आठ माध्यमातून उपलब्ध असतील. सेमी इंग्रजीच्या विद्यार्थ्यांना मूळ माध्यमाऐवजी विज्ञान- गणित विषयांसाठी इंग्रजी माध्यमाची प्रश्नपत्रिका देण्यात येतील.

**७ ) परीक्षेचे मूल्यमापन : -** उत्तरपत्रिकांची तपासणी संगणकामार्फत OMR पध्दतीने करण्यात येईल.

**८ ) राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा : -** राज्यस्तरीय परीक्षेतून गुणवत्तायादीतून राज्याला ठरवून दिलेल्या कोटयानुसार निवडलेल्या उमेदवारांनाच अंतिम परीक्षेस बसता येईल. अंतिम परीक्षा राष्ट्रीय शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद ( N.C.E.R.T ) नवी दिल्ली यांचेमार्फत दरवर्षी साधारणातः मे महिन्यात महाराष्ट्रात मुंबई आणि पुणे येथे घेण्यात येते.

**९ ) शिष्यवृत्ती : -** अखिल भारतीय पातळीवर शिष्यवृत्तींची संख्या १००० असून यासाठी एसी साठी १५०, एस.टी साठी ७५ आणि खुल्या प्रवर्गासाठी ७७५ शिष्यवृत्या ठरवून दिलेल्या आहेत. तसेच संबंधित संवर्गात ३ टक्के अपंगासाठीचे आरक्षण असेल.

**१० ) शिष्यवृत्ती दर : -** शिष्यवृत्ती धारकांना खालीलप्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येईल.

| अ.क्र | तपशील | दरमहा शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|
| १ | शालान्त परीक्षेनंतर ( इ.११ वी व इ.१२ वी ) | ५०० (वार्षिक रू.६०००) |
| २ | सर्व शाखांच्या प्रथम पदवीपर्यंत ( दा. बी.ए, बी.कॉम, बी.एस्सी ) | ५०० (वार्षिक रू.६०००) |
| ३ | सर्व शाखांच्या व्दितीय पदवीपर्यंत (पदव्युत्तर पदवीपर्यंत ) | ५०० (वार्षिक रू.६०००) |
| ४ | पी.एच.डी साठी ४ वर्षापर्यंत | ( व्यवसायिक अभ्यासक्रम वगळून इतर शाखांसाठी ) विद्यापीठ आयोगाचे नियमानुसार मान्य दराने. |